सी. ई. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुंकळ्ळी – गोवा

## मराठी विभाग

# युवांकुर

अंक ४, वर्ष २०२३



**मराठी विभागाचे साहित्यिक नियतकालिक,**

**आपल्या हक्काचे व्यासपीठ**

**अनुमोदक :** प्राचार्य डॉ. संजय सावंत देसाई

सहयोगी प्रा. चतुरा साकोर्डेकर

**संपादन मंडळ :**

सहायक प्रा. शुभलक्ष्मी नाईक गावकर

सहायक प्रा. निखिता गावकर

अनामिका सावंत

धन्यता देसाई

सरोजा गावकर

अनिशा गावकर

सलोनी फळदेसाई

प्रियांका च्यारी

अश्मिता परवार

# अनुक्रमणिका


❖ **संपादकीय**

❖ **कथा :** मैत्री /अनामिका सावंत

❖ **निबंध**

१. छंद / सलोनी फळदेसाई
२. एका तरुणाचे पत्र / अनामिका सावंत
३. श्रावण / वैभवी च्यारी
४. व्यायामाचे महत्त्व / वैभवी च्यारी
५. पहिल्या पावसाच्या आठवणी / सरोजा गावकर
६. प्रेम / सरोजा गावकर
७. माझा आवडता महिना – श्रावण महिना / प्रियांका च्यारी
८. अनाथांची माय : सिंधुताई सपकाळ / श्रेया तळवडेकर

❖ **कविता**

१. प्रेम/ अनामिका सावंत
२. मागणं काय / अनामिका सावंत
३. पहिला पाऊस / अनामिका सावंत
४. मुलींच्याच बाबतीत का? / प्रियांका च्यारी
५. वसंत / अनिशा त. गावकर
६. वीर शिवाजी राजे / धन्यता देसाई
७. समर्पण / धन्यता देसाई
८. वसुधैव कुटुंबकम / धन्यता देसाई
९. त्याच्यातील ती / अश्मिता परवार
१०. बंध रेशमी मैत्रीचे / राज सावके
११. प्रीत सांज / राज सावके
१२. बाबा / राज सावके
१३. जैत / सलोनी फळदेसाई
१४. सोबत / अश्मिता परवार
१५. बाबा /अनिशा प्र. गावकर
१६. प्रेम /रेखा मायनाथ
१७. पाऊस / किर्ती वेळीप

## संपादकांच्या खिडकीतून डोकावताना..

प्रिय वाचकहो..

मराठी विभागाच्या ‘युवांकुर’ e-मासिकाचा हा चोथा अंक. मागच्या तीन अंकांना आपण भरघोस प्रतिसाद देऊन आम्हाला हा उपक्रम पुढे नेण्यासाठी अजून बळ दिले. ज्या ध्येयाने हा उपक्रम सुरू केला होता तो हळू-हळू पूर्णत्वास येताना अत्यंत आनंद होत आहे. वाचन व लेखन ही एक साधना आहे. वाटते तेवढी सोपी कला ही अर्थातच नाही. महाविद्यालयातील विद्यार्थी ह्या दिशेने एक-एक पाऊल टाकत, धडपडत, आपल्या प्रतिभेच्या पंखांनी मराठी साहित्याच्या ह्या सृजनशील क्षेत्रात मनसोक्त विहार करताना पाहून मन प्रफुल्लित होत आहे.

हाच मराठीचा ध्यास घेऊन असेच पुढे जात राहूयात व मराठीची सेवा करूया..

मनस्वी आभार,

संपादन मंडळ

# कथा

# मैत्री

**अनामिका सावंत (द्वितीय वर्ष, कला शाखा)**

तालूक्यावरून जरा दूर, आत, चारही बाजूंनी डोंगराच्या रांगेत मधोमध वसलेले एक छोटेसे खेडेगाव होते. गावाच्या बाजूला एक ओढा वाहत होता. त्याचे पाणी शेजारच्या गावाच्या धरणाला जाऊन मिळायचे. गाव असल्यामुळे सगळीकडे हिरवीगार शेती होती. वेगवेगळी पीकं पिकवली जायची. या गावात वीणा नावाची एक गोड मुलगी आपल्या आईसोबत राहायची. तिचे वडिल ती लहान असतानाच वारले होते. त्यामुळे तिच्या घरची परिस्थिती खूप हालखिची होती. तिची आई मोलमजुरी करून गुजरण करायची. मुलीला शिकविण्या इतकी ऐपत तिची नव्हती. पण आपल्या वयाची मुले शाळेत जातात हे पाहून त्या इवलूशा मुलीला शिकण्याची आवड निर्माण झाली होती.

काळ्या घनदाट केसाची लांब वेणी, त्याला बांधलेली ती लाल रिबन आणि ठिगळं लावलेले ते झबलं. गोड हसणं, शांत स्वभाव, सतत काहीतरी विचार करत बसणे अशी ती गोड स्वभावाची होती.

"ऐ वीणे इकडे ये बघू" तिच्या आईने तिला आवाज दिला.

आईचा आवाज ऐकून ती लगेच हजर झाली व म्हणाली, "काय गं आई?"

"मी सरपंच्याकडे जातेय कामाला. पेज शिजवली हाय भूक लागली तर खाऊन घे आणि हो इकडे-तिकडे भटकू नकोस इथेच काय ते खेळ." त्यावर ती आपला चेहरा पाडून म्हणाली, "अगं आई कुठ जाणार मी. गावातील सगळी मुले गेली हाय्त शाळेत आणि मी एकटीच हाय आणि कुणी घेत बी नसतंय खेळायला त्यांच्यासोबत ती म्हणत्यात मी शाळेत न्हाय जात म्हणून आवडत न्हाय त्यांना माझ्यासंगत खेळायला."

तिचं बोलणं ऐकूण आई तरी काय बोलणार आईने तिच्या गालावरून हात फिरवला तिचा मुका घेतला व ती कामाला गेली. वीणा आपली एकटीच खेळत बसली होती.

गावातील मास्तरांची बदली झाली होती. दोन दिवसांनी गावात नवीन मास्तर येणार होते. त्यामुळे गावातील मुले भलतीच खूश झाली होती. जुन्या मास्तरां इतके नवीन मास्तर कडक नसावेत अशी त्यांची देवाकडे मागणी होती.

शेवटी तो दिवस उजडला. मुलांची उत्सुकता शिगेला पोहोचली. नवीन मास्तर आपल्या बायको व आपल्या सहा-सात वर्षांच्या मुलीसोबत आले. ती गोड मुलगी दिसायला जणू बाहुलीच वाटत होती. तिने मस्त परीसारखा ड्रेस घातला होता. छोटुसे केस पाठीवर सोडून इवल्याशा डोळ्यांनी इकडे तिकडे बघत होती. मास्तरांची नोकरी असल्यामुळे त्यांची बदली होतच असते व त्यामुळे आपल्या बायको मुलीलाही त्यांना सोबत घेऊन फिरावे लागते.

दुसरा दिवस उजाडला कोंबड्याने बांग दिली, गावातील सगळी लोकं मुलांना शाळेत सोडून शेतावर गेली. मास्तर आपल्या मुलीला घेऊन शाळेत गेले. मास्तर कडक शिस्तीचे नाही आहेत, हे पाहून मुलांना खूपच आनंद झाला. वीणा मात्र नेहमीसारखेच एकटीच बसली होती. संध्याकाळ झाली, शाळा सुटली. मास्तरांची बायको आपल्या मुलीला घेऊन गावात फिरत होती. तेव्हा त्या मुलीची नजर वीणावर पडली. वीणा एका झाडाखाली निवांत बसली होती. तिला एकटीला बघून मास्तरांच्या मुलीच्या मनात प्रश्न पडला, "अरे ही मुलगी तर शाळेत दिसलीच नाही मला, का बरं आली नसेल ती शाळेत व इथे का एकटीच बसली असेल?" ती वीणा जवळ गेली. तिला पाहून वीणा उठून उभी राहिली.

"हाय, माझं नाव स्वरा मी मास्तरांची मुलगी आहे. तुझं नाव काय?" तिने मैत्रीचा हात पुढे करत वीणाला प्रश्न विचारला व तिचे नाव कळताच लगेच पुढचा प्रश्न विचारला "तू इथे एकटीच का बसली आहेस?" त्यावर वीणा म्हणाली "मी शाळेत नाही जात. माझी आई म्हणते तिच्याजवळ मला शाळेत पाठविण्यासाठी पैसे नाही आहेत आणि म्हणून माझ्या सोबत कोणी खेळत पण नाही." स्वराला हे ऐकून खूप वाईट वाटले. त्यावर तिने म्हटले "आजपासून आपण दोघेही खेळूया. सोबत अभ्यासही करूया चालेल ना तुला? माझ्याशी मैत्री करशील ना?" आपल्यासोबत कोणीतरी मैत्री करायचं म्हणतयं. यावर वीणा एकदम खुश झाली आणि तिची मैत्री तिने स्वीकारली.

घरी जाऊन स्वराने वीणाविषयी सांगितले. तिच्या दयाळू वडिलांनी वीणाच्या आईची समजूत काढत सरकारी शाळेत वीणाला प्रवेश मिळवून दिला. वीणा जिद्दीने अभ्यास करू लागली. आपण आपल्या आईचा कणा बनू हे तिने पक्कं ठरवून टाकलं होतं.

स्वरा आणि वीणा दोघी एकाच वयाच्या असल्यामुळे जे काही स्वरा शाळेत शिकायची ते ती वीणाला शिकवायची, दोघी खूप खेळायच्या, मस्ती करायच्या. वीणाचे आयुष्य बदलत होतं. ती तर नेहमी हसत राहायची. तिला आनंदी बघून तिच्या आईलाही खूप बरं वाटायचं पण हे सगळं थोड्याकाळासाठी होतं, पुन्हा वीणाच्या आयुष्यातून सुख जाणारच होतं, हे तिच्या आईला कळालं होतं. तर बघता - बघता वर्ष उलटली आणि मास्तरांची पुन्हा बदली झाली, हे जेव्हा स्वराला कळालं ती धावत वीणाला भेटायला आली आणि तिने तिला सगळं सांगितलं, त्यावर त्या दोघी खूप रडू लागल्या.

आपली मैत्री ही इथपर्यंतच होती हे त्यांना समजले. वीणाला तर अन्न गोड लागत नव्हते. शेवटी जाण्याचा दिवस आला. गाडी मास्तरांच्या दारात आली. मास्तर आपलं सामान गाडीत ठेवत होते. तर स्वरा नाही जायचं म्हणून हट्ट करत होती. शेवटी वीणाच तिची समजूत काढत म्हणाली, "हे बघ असं न्हाय रडायचं. आपली मैत्री कधीच न्हाय तुटायची. मी तुला कधीचं न्हायं विसरायची. तू जे काही केलं हाय माझ्यासाठी ते मी कधीच विसरणार न्हाय. आज तुला जावं लागणार पण आपण नक्कीच पुन्हा भेटू.." दोघी आलिंगन देऊन स्वरा गाडीत बसली. दोघांचंही रडणं मात्र थांबत नव्हतं. गाडी निघाली. दोघींच्या वाटा वेगळ्या झाल्या. मात्र स्वरामुळे वीणाला शिक्षणाचा मार्ग गवसला.



# निबंध

# छंद

**सलोनी उपेंद्र फळदेसाई (प्रथम वर्ष, कला शाखा)**

माणसातील सुप्त गुण त्याला स्वत:लाच कधीकधी कळत नसतात. अशा वेळी एखादी छोटीशी घटना किंवा प्रसंगातून ते अचानक प्रकट होतात आणि मग त्यातूनच साकारतो एखादा छंद. छंद हा माणसाच्या जीवनातील खरा दागिना आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. माणसाला सर्वात जास्त सुख, आनंद आणि समाधान जर कोणत्या गोष्टीमुळे मिळत असेल तर तो म्हणजे छंद. त्यामुळे प्रत्येक जण आपापल्या आवडी प्रमाणे एक तरी छंद जोपासत असतात.

मला देखील छंद जोपासायला खूप आवडतो. वाचन करणे हा माझा आवडता छंद आहे. मला लहानपणापासून गोष्टींची पुस्तके वाचायला खूप आवडतात. त्यामुळे मी माझा हा छंद आजही जोपासत आहे. माझ्याकडे नेहमी एक तरी पुस्तक असतेच. मला जेव्हा वेळ मिळतो तेव्हा मी ते वाचतचं असते. वाचनाची आवड मला लहानपणापासून आहे मी जशी-जशी मोठी होत गेले तशी-तशी माझ्यात नवनवीन पुस्तके वाचायची उत्सुकता वाढू लागली. मी आजही साने गुरुजींची, ऐतिहासिक कादंबऱ्या, कथा अशी अनेक पुस्तके वाचत असते.



शाळेत असताना सुध्दा मी खूप पुस्तके वाचत होते. आमच्या शाळेतील शिक्षिका आम्हाला दर आठवड्याला नवीन पुस्तक घरी न्यायला देत असत. एका वेळी एकच पुस्तक घरी न्यायला मिळत असे. घरी नेलेलं पुस्तक फाटले तर त्याचे पैसे लायब्ररीमध्ये भरावे लागायचे. म्हणून घरी आणलेले पुस्तक मी काळजीपूर्वक हाताळायचे. मला जेव्हा माझ्या अभ्यासातून वेळ मिळतो तेव्हा मी मोबाईल मध्ये टाईमपास करण्याऐवजी एखादे पुस्तक वाचणे पसंत करते. यातून मला ज्ञान आणि माहिती मिळते शिवाय मनोरंजनही होते. त्यामुळे 'वाचाल तर वाचाल' हे ब्रीद मी कोरूनच घेतलेले आहे.

# एका तरुणाचं पत्र...

**अनामिका सावंत (द्वितीय वर्ष, कला शाखा)**

प्रिय मित्रा,

होय, तुला मित्रंच म्हणावसं वाटतं कारण, तूही आम्हा तरुणांमधलाच एक असावा किंवा तुझं ते वय सरलंही असावं किंवा भविष्यात तू आमच्यातला एक बनशील. थोडक्यात काय तर, मी माझं मन तुझ्याशीच मोकळं करणार नाही तर मग कुणाकडे करणार?

आम्हा तरुणांना देशाचा भावी स्तंभ वगैरे म्हटले जाते. आपण खंबीर राहिलो तर देश खंबीर बनेल. खरं म्हणजे जरा दडपणच येतं. आधीच आपण किती पाण्यात आहोत हे वारंवार दाखवून दिलं जातं. मान्य आहे रे, आपण भरकटलोय. हातातील पुस्तकांची जागा मोबाईलने घेतली आहे. पुस्तकांनी घडवलेल्या पिढीमध्ये व आपल्यात फार अंतर आहे असं सांगितलं जातं. पण त्यात चूक ही काय मोबाईलची आहे का? जी गोष्ट माणसांनी सोयीसाठी बनवलेली आहे त्या गोष्टीचा वापर वाईट पद्धतीने करून आपण दोष त्या मोबाईललाच देतो.

पण ह्याच फोनमधून आपण अनेक चांगल्या गोष्टी शिकू शकतो. वाचन करू शकतो. आजचा तरुण वाचत नाही हे विधान म्हणूनच मला पूर्ण वाटत नाही. आपली पद्धत वेगळी आहे. आज कित्येक तरुण हातात पुस्तकं न घेताही फोनवरून अत्यंत चांगली e-पुस्तकं वाचतात. जे वाचत नाहीत त्यांना मुळात नेमकं काय वाचावं तेच कळत नाही. ते एरवीही वाचन करत नाहीत. विविध समाज माध्यमांमुळे आपल्याला जगात घडत असलेल्या गोष्टी समजत असतात. त्यातही तरुण वर्गाचा सहभाग दिसतो. विविध गोष्टी जाणून घेऊन आपल्या पद्धतीने चर्चा करणे. नवे विचार मांडणे हे काम कित्येक तरुण करतातच की.

जगाला आज तरुणाईच्या विचारांची, नेतृत्वाची गरज आहे. कारण काळ बदललेला आहे. त्यामुळे सतत सुधारणा होत असतात. त्यामुळे काळ आणि कृती यांना नव्या विचारांचीच व्यक्ती जोडून घेऊ शकते. त्यामुळे तुला असं नाही का वाटत की आपल्याला नेतृत्व करण्याची व स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळाली पाहिजे.

बऱ्याच ठिकाणी तरुणांना स्वतःला सिद्ध करण्याचीही संधी दिली जाते. पण शेवटी आपणच एकमेकांकडे बोटं दाखवतो. तेव्हा आपण पुढाकार घेतो का याचाही विचार आपण केला पाहिजे.

म्हणूनच म्हणते, आपण स्वतःला अगोदर सक्षम बनवूया. वाचन करूया, थोरामोठ्यांच्या मार्गदर्शनातून शिकूया. वाईटाचा त्याग करून चांगलं जे आहे ते आत्मसात करूया. आपल्या बंद मुठीत संपूर्ण जग जिंकण्याची ताकद आहे रे. हेच जगाला दाखवून देऊया. तेव्हाच आपला देश प्रगती करेल.

तुझाच,

वर्तमानातील तरुण व भावी आधार.

## श्रावण

**वैभवी प्रकाश च्यारी (प्रथम वर्ष, कला शाखा)**

श्रावण हा मराठी महिन्यातील पाचवा महिना आहे. श्रावणात संपूर्ण सृष्टी हिरवीगार झालेली दिसून येते. श्रावणतील सोमवारी शंकराची पूजा उपासना करण्याची पध्दत आहे. याशिवाय याच श्रावण महिन्यापासून सर्व सणांची सुरवात होते. नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, श्रीकृष्ण जन्माष्टमी यासारखे सण साजरे होतात.

श्रावण महिन्यात येणारा पहिला सण म्हणजे नागपंचमी या दिवशी नागाची पूजा केली जाते. त्याचप्रमाणे नारळी पौर्णिमेला सागराला भक्तिभावाने नारळ अर्पण केला जातो. तर या शिवाय श्री कृष्ण जन्माष्टमी मोठ्या आनंदात साजरी करतात. याशिवाय रक्षाबंधन हा भावा-बहिणीचा  सण आहे. या दिवशी बहिण भावाला राखी बांधते या सारखे सण साजरे होतात. या महिन्यात मंदिरामध्ये धार्मिक ग्रंथांचे वाचन केले जाते. हा श्रावण महिना सर्वांसाठी अतिशय खास असतो.

## व्यायामाचे महत्त्व

**वैभवी प्रकाश च्यारी (प्रथम वर्ष, कला शाखा)**

मनुष्य तेव्हाच सुखी राहू शकतो जेव्हा त्याचे शरीर स्वस्थ आणि तंदुरूस्त असेल. स्वस्थ शरीरासाठी नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. व्यायाम केल्याने शारीरिक सुखासोबत मनुष्याला मानसिक संतुष्टीची प्राप्ती होते कारण व्यायाम केल्याने त्याचे मन प्रफुल्लित, उत्साहपूर्ण आणि आनंदी राहते. इंग्रजीत एक म्हण आहे. ‘Health is wealth’ या म्हणीचा अर्थ होतो की आरोग्य हीच संपत्ती आहे. व्यायामाने खूप सारे लाभ होतात. व्यायाम केल्याने शरीरात प्रफुल्लता वाढते आणि नियमित करणारा व्यक्ति प्रसन्न राहतो.

व्यायाम प्रत्येक दिवशी नियमित पध्दतीने करायला हवा. व्यायामाचे वेगवेगळे प्रकार आपल्याला शाळेत शिकवले जातात त्यामुळे आजच्या काळात व्यायाम शाळाही उपलब्ध आहे. आपला भारत देश योगाभ्यासाठी प्रसिध्द आहे. वेगवेगळी आसने, प्रणायाम केल्यामुळे आपले शरीर सदृढ राहते. असे केल्याने आपले शरीर निरोगी मन शांत व पवित्र राहते



# पहिल्या पावसाच्या आठवणी

**सरोजा गावकर (तृतीय वर्ष, कला शाखा)**

पहिल्या पावसाची आठवण वर्षभर राहते कारण पहिल्या पावसामुळे मातीला येणारा सुगंध अगदी मोहक असतो. पावसाळा सुरू होताच आणि पावसाच्या सरी कोसळू लागताच पक्षांची, पाखरांची आपल्या घरट्याकडे निघण्यासाठी धावपळ सुरू होते.

शेतकऱ्यांसाठी पाऊस हा खूप मोठा महत्वाचा ऋतू आहे. शेतकरी पिकवतात म्हणून आपण खाऊ शकतो म्हणून पाण्याशिवाय काहीच नाही. पाऊस आला की आम्ही सर्व मुले तर नुसती पावसामध्ये भिजत असतो घरी जाऊन आईची ओरडा खातो पण तरीही मजा मस्ती चालूच असते. मला पावसाळा खूप आवडतो. सगळीकडे झाडे हिरव्या रंगांनी लाल निळ्या पांढऱ्या फुलांनी भरलेली असतात.

पाऊस आला की शेतामध्ये फिरायला जाण्याची मज्जाच काही औरच असते. सगळीकडे पाणीच पाणी साठलेले असते. नाले, तलाव, डबके आणि ओढे अगदी तुडुंब पाण्याने भरलेली असतात. पाण्याने भरलेल्या डबक्यामध्ये छोटे छोटे दगड टाकायला खूप मजा येते आणि पाण्यात टाकलेल्या दगडामुळे पाण्यात तयार होणारी वलये जणू आनंदाची वलये असतात.



पाऊस हा पहिल्या प्रेमासारखा असतो. प्रेमाच्या सरीत चिंब भिजणारा पाऊस हवाहवासा वाटणारा, आपल्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा पाऊस म्हटला की आठवणी असणारच. काय भारी होते ते दिवस मित्र मैत्रिणी सोबत पावसात भिजणे स्कूल बंक करून चिखलामध्ये नाचणे आणि त्यानंतर सरांचा ओरडा खाणे खरंच खूप छान होते ते दिवस. चिंब भिजणारा, प्रेम व्यक्त करणारा, तो पहिला पाऊस सगळीकडे हिरवळ असते. मन प्रसन्न वाटत असते. पाऊस आला की आम्ही गाणी म्हणतो, अंताक्षरी खेळतो, पावसामध्ये नाचत असतो, एकमेकांच्या अंगावर पाणी उडवत असतो. तो पावसाळा संपला की आम्हाला पावसाची खूप आठवण येते म्हणून आम्ही मोठ्या आनंदाने म्हणतो. "तू येरे येरे पावसा तुला देतो पैसा ! पैसा झाला खोटा पाऊस आला मोठा!"

# प्रेम

**सरोजा गावकर (तृतीय वर्ष, कला शाखा)**

प्रेम ही एक अनोखी भावना आहे. ज्यात आपण एकमेकांची काळजी करतो. प्रेम कुणावरही करता येते. कुटुंब, मित्र-मैत्रिणी, पाळीव प्राणी, निसर्ग आणि स्वतःवरही प्रेम करता येते. प्रेमाचा अर्थ विश्वास, प्रामाणिकपणा, काळजी होय. प्रेम ही अशी भावना आहे की प्रत्येकजण दुसऱ्याची काळजी करतो. जरी आपण वेगवेगळे असलो तरीही प्रेम आपल्या सर्वांना एकत्र ठेवते.




प्रेमाचा प्रथम अनुभव जन्माच्या वेळी येतो. जे प्रेम आपण आई वडिलांवर करतो ते आपले पहिले प्रेम असते. सर्व मुलांना पालकांच्या प्रेमाची आवश्यकता असते. पालक जन्मापासूनच आपल्या मुलावर प्रेम करतात, चांगले संस्कार करतात. आपण कितीही मोठे झालो तरीही त्यांचे प्रेम कधीही बदलत नाही.

पालकांनंतर आपण आपल्या भावंडांवर व मित्रांवर प्रेम करतो. भावंडे भांडत असली तरीही ते नेहमी एकमेकांवर प्रेम करतात. आमच्याबरोबर खेळणाऱ्या, नेहमी सोबत असणाऱ्या मित्रांवर सुद्धा प्रेम जडते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मित्र अशी व्यक्ती आहे ज्यावर आपण डोळे बंद करून विश्वास ठेवतो. ज्याच्यावर आपण खूप प्रेम करतो आणि जीवनाच्या सोबतीला मित्र तर असायलाच हवा.

प्रेम हा पती-पत्नीचा नाजूक बंधाचा आधार आहे. प्रेमासाठी विश्वासाची आवश्यकता असते. पती-पत्नीचं नातं नेहमी विश्वासावर अवलंबून असते. जे एकमेकांची काळजी करतात आनंदी ठेवतात.

प्रेम फक्त इतर लोकांबद्दल नाही तर ते स्वतःवर सुद्धा असणे गरजेचे आहे. प्रेम म्हणजे इतरांना जे जसे आहेत तसेच स्वीकारणे त्यांच्याकडून काय अपेक्षा करतो ते नाही. प्रेम आपल्याला आनंदी ठेवते. आपण कोणासाठी महत्त्वपूर्ण आहोत याची जाणीव करून देते.

जे मोजून सांगता येत नाही त्यालाच प्रेम म्हणतात. आपल्या आयुष्यातील कोणत्याही नात्याचा आधार प्रेम आहे. आपण स्वतःवर आणि आजूबाजूच्या लोकांवर प्रेम करायला शिकले पाहिजे.

# माझा आवडता श्रावण महिना

**प्रियांका शंभू च्यारी (प्रथम वर्ष, कला शाखा)**

मराठी महिन्यापैकी एक महत्त्वाचा महिना म्हणजे श्रावण मास. श्रावण महिन्याला आपण सणांचा व पावसाचा महिना असेही म्हणू शकतो, कारण श्रावण हा महिना म्हणजे सर्व हिंदू धर्मीय लोकांचा आवडता महिना आहे. या महिन्याची सर्वजण आतुरतेने वाट पाहत असतात कारण या महिन्यात आपल्या संस्कृतीत बरेच सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजर केले जातात.हा महिना वर्षाचा पावसाळ्यातील जुलै / ऑगस्ट या महिन्यात असतो. त्याला पावसाचा महिना असेही म्हटला जातो. या महिन्यात तर सगळीकडे हिरवे हिरवे शेत व पावसाचे भरलेले आभाळ सगळीकडे कस शांत व पावसात भिजलेल्या मातीची सुगंध दरवळलेला असतो. एवढेच नाही तर वेगवेगळया प्रकारची फळे,फुलं बघायला मिळतात.



हिंदू लोक या महिन्यांमध्ये विशेष काही दिवस उपवास करतात आणि महिनाभर तरी काही शाकाहारी व शुद्ध अन्न खातात. माझ्या घरी पण हा श्रावण महिना पाळला जातो तर या महिन्यात अनेक सण ही साजरा केले जातात आणि ते म्हणजे सर्वांचे आवडते सण नागपंचमी, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा व सर्वात शेवटचा जन्म जन्माष्टमी. नागपंचमी हा सण थोड्यांच्या घरात साजरा केला जातो आणि त्यानंतरचा सण हा रक्षाबंधन हा सण तर सर्वांचा आवडता असतो. खास करून मुलींचा हा दिवस म्हणजेच भावा - बहिणीचा नात्यांचा असतो. तर त्या दिवशी बहिण भावाला राखी बांधते व भावाकडून आशीर्वाद, भेटवस्तू घेते. हा तर माझाही खूप आवडता सण आहे.

शेवटचा सण जो आहे तो म्हणजे जन्माष्टमी तर हा पण एक धमाल मस्ती करण्याचा दिवस त्या दिवशी गावागावात मुले दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम ठेवतात. तर शाळेत लहान लहान मुलांना कृष्णाचे रूप, राधेचे रूप करून त्यांना शाळेत स्पर्धेसाठी घेऊन जातात. त्यादिवशी माझ्या घरी कृष्णाची छोटी मूर्ती पूजेला लावून त्याची व त्याला नेवेद्य केला जातो. घरात गोड गोड पदार्थ केले जातात. देवाला भेल, तुळशी व फुल घालून त्याला नमस्कार केला जातो आणि म्हणूनच श्रावण हा महिना खूप - खूप आवडता महिना आहे.

# अनाथांची माय – सिंधुताई सपकाळ

**श्रेया तळवडेकर (प्रथम वर्ष, कला शाखा)**

सिंधुताई सपकाळ ह्या एक थोर सामाजिक कार्यकर्त्या म्हणून लोकप्रिय आहेत. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८ रोजी झाल. त्या महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील मेंढपाळ कुटुंबातील आहेत. सिंधूताईंचे बालपण अत्यंत कष्टमय असे होते. सिंधूताईंना नेहमीच अन्यायला सामोरे जावे लागले. तिच्या घराण्यात या अगोदर कुणीही शिकले नसल्याने तिला शाळेत जायला आईने विरोध केला. जंगलातून लाकडे आणताना व शेण गोळा करताना सापडलेले कागदाचे तुकडे माई घरी आणायच्या आणि उंदराच्या बिळांत लपवून ठेवायच्या. क्वचित घरी एकट्या असल्या की त्या अभ्यास करण्याचा प्रयत्न करायच्या.



वयाच्या ९ व्या वर्षी त्यांच्यापेक्षा वयाने २६ वर्षांनी मोठे असलेल्या श्रीहरी सपकाळ यांच्याशी त्यांचा विवाह झाला. गर्भावस्थेत असताना त्यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन त्यांच्या नवऱ्याने त्यांना गुरांच्या गोठ्यात आणून टाकले स्टेशनवर, स्मशान भूमीत राहून त्यांनी दिवस काढले. त्यांनी अनाथाश्रमे सुरू करून अनेक मुला-मुलींना दत्तक घेतले. २०२१ मध्ये त्यांना भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार मिळाला. ४ जानेवारी २०२२ ह्रदयविकाराच्या धक्क्यामुळे त्यांचे निधन झाले. आज जरी माई आपल्यात नसल्या तरीही त्यांनी केलेल्या कार्यामुळे माई अमर बनल्या आहेत .



# कविता

# प्रेम

अनामिका सावंत (द्वितीय वर्ष, कला शाखा)

प्रेम नक्की काय असतं ?

समजलं तर समजलं

नाहीतर कोडच असतं

कोण म्हणतं प्रेम आंधळ असतं

तर, कोण म्हणतं प्रेम अनावर असतं

तर, काही जणांचं म्हणणं प्रेम

एकदाच होतं

पण काहीजण सांगतात प्रेम अनेकदा होतं

प्रेमाचं ह्या काहीच समजेना

पडलेलं कोडं काही सुटेना

काही का असेना पण

हे प्रेम फार गोड असतं

ज्याने कोणी अनुभवलं

त्याला ते नक्की समजलं

प्रेम हा मनाचा खेळ असतो.

त्यात खरा-खोटा कोणच नसतो

प्रेमामुळे नवीन नाती जुळत जातात

प्रश्नांची उत्तरे सुटत जातात

प्रेम नक्की काय असतं हे तर

सांगता नाही येणार

तो सगळ्यांचा वेगवेगळा अनुभव असतो

जो शब्दांत मांडता येत नसतो.



# मागणं काय ?

अनामिका सावंत (द्वितीय वर्ष, कला शाखा)

अंधार दाटून आले
काळे मेघ
मंद वाहतो
वाऱ्याचा वेग
हळूवारी आली
पावसाची सर
सुगंध पसरला
मातीचा धरणीवर
तृप्त झाली ती
धरती माय
शेतकऱ्याला आणखी
हवचं काय?
पाण्याचे साठे
तुडूंब भरले
सगळ्यांसाठीच जीवन दान
प्रसन्न झाले माझे मन
अशीच फुलूदे माझी
धरती माय.
आणखी देवा
मागणं काय?
आणखी देवा
मागणं काय?



# पहिला पाऊस

अनामिका सावंत (द्वितीय वर्ष, कला शाखा)

आला आला पाऊस पहिला
वीज चमकून वारा सुटला
रस्त्यावरच्या पाण्याला
खळखळाट आला

सर सर करून पाऊस आला
शिवार सजलं हिरवगार
मोरांचा नाच वारंवार
मुलांना कागदाच्या होड्यांचा
नादच फार

छत्री घेऊन बाहेर पडायला
एका पायावर तयार

शेतकरी राजा तर
घेतो सुखाचा श्वास
तरूणांच्या मनाला प्रेमाचा आभास

आला आला पहिला पाऊस
भिजवायला धरणी मातेची कूस



# मुलींच्याच बाबतीत का ?

**प्रियांका शंभू च्यारी (प्रथम वर्ष, कला शाखा)**

जन्म घेते एका घरी

मरण पावते दुसऱ्या घरी

मुलींच्याच बाबतीत का ?

सोडून येते माहेर

ऐकून घेते सासरी

मुलींच्याच बाबतीत का ?

लग्न होऊन होते परकी

सगळ्यांना आपलेसे बनवते नव्या घरी

मुलींच्या बाबतीत का?

आई-बाबा लहानाचे मोठे करतात

तिचा हात दुसऱ्याला सांभाळायला देतात

मुलींच्याच बाबतीत का?

मनात सारे ठेवून

मौन ती बाळगते

दु:खातही सांभाळून घेते

मुलींच्याच बाबतीत का ?



# वसंत

अनिशा त. गावकर (द्वितीय वर्ष, कला शाखा)

मन मग्न झालंय

ह्या मंद वाऱ्याने

ओशाळल्या सरीने

अन पावसाच्या आगमनाने



काजव्याच्या उजेडाने

अन बेडकांच्या गाण्याने

ह्या वसंताच्या आगमनाने

ती कोकीळही गातेय गाणे

पृथ्वीही शहारतेय मोहरून उठतेय

मोरही जल्लोष करताय

पिसारा फुलवून थुई थुई नाचतायत

साद घालतायत इंद्रधनुष्याला

कसं पकडू शब्दात ह्या वसंताला ?

नि:शब्द मी... न्याहाळतेय ही निसर्गाची किमया....

हा वसंत दुसरं तिसरं काही नाही

आहे एक जीवनधारा....

# वीर शिवाजी राजे

धन्यता देसाई (तृतीय वर्ष, कला शाखा)

जो लढला आपल्या देशासाठी स्वराज्यासाठी,

जो लढला आपल्या रयतेसाठी

तोच असेल शिवाजी आमच्यासाठी

धर्माचा मर्म पटवणे

शत्रूला धडा शिकवणे

रयतेचा सन्मान राखणे

कर्तव्यांचे पालन करणे

हेच आमच्या शिवरायांचे हो सांगणे

या सिंहाने घेतला जिजाऊ पोटी जन्म

जिनी शिकवला धर्म

केले ज्यांनी सत्कर्म

असे आपले शिवबा..

मराठी माणसाची शान

रयतेची मान

देवाप्रमाणे तुजले त्यांना

तेच आमचे प्राण

ज्यांनी उभारली स्वराज्याची पताका

अहो ज्यांनी उभारली स्वराज्याची पताका



इतिहासातील सुवर्ण युग ज्यांनी घडविला

तोच आपला शिवाजी राजा!

सिंहाचा तो सूत

वाघिणीचा जो पुत्र

सह्याद्रीचा जो हिरा

माणुसकीचा झेंडा त्यांनीच तर हो फडकविला

ताठ मानेंनी ज्यांनी जगायला शिकविले

अहो परिस्थितीला त्यांनीच तर भिडायला शिकविले

शिवबा पासून छत्रपती शिवाजी महाराज जे बनले

तेच होते

वीर शिवाजी राजे

वीर शिवाजी राजे

वीर शिवाजी राजे..

# समर्पण

धन्यता देसाई (तृतीय वर्ष, कला शाखा)

डोळ्यातले अश्रू
मेघासमान भरले

डोळ्यातून वाहणारे अश्रू
घट्ट मोठी धरून ठेवले

मनाची ओढ हळूहळू दुरावली
टिमटिमणाऱ्या नक्षत्रांबरोबर तीही झोपून गेली

दुःख होतं मनात
पण कुणाशी बोलता काही आलं नाही

प्रेमाचा गारवा
दुःखात कधी सोडून गेला कालच नाही

साजूक तुपावाणी मन विरघळून गेले तुझ्यावर
साजूक त्या तुपाला थांबता काही आला नाही

विरघळून कधी संपून गेल
हे ही माझं मला कधी कळलं नाही
माझं मलाच कधी कळलं नाही..



# वसुधैव कुटुम्बकम

धन्यता देसाई (तृतीय वर्ष, कला शाखा)

पृथ्वी आहे आपली एक,

माणसे आहोत आपण अनेक

कुणाची जात, धर्म, पंथ,

हे नसतं महत्त्वाचं... कारण,

शेवटी रक्त तर सगळ्यांचं एकच असतं

माणूस माणसाला विसरला

म्हणूनच तर त्यांनी

युद्धाचा शोध लावला

युद्ध कालही होत होते,

आजही होतात,

उद्याही होणार,

मात्र ते आपल्यालाच थांबवावे लागणार

युद्ध केले कितीही

सत्ता जरी मिळवली

स्वामित्व कोणावर गाजवणार?

शेवटी आई एकच सर्वांची

याच मातीत जन्माला आलो

इथेच मरून जाणार...

शेवटी माणूसच माणसाच्या कामी येणार

म्हणूनच राहू सतत धरणी मातेच्या ऋणी

मिसळून राहू आपण

जपून ठेवू नाती

कुणाची मान खाली झुकणार नाही

याची घेऊ खात्री

थोर वीरांनी जोडलेले विश्व

विनम्रतेने जोडून ठेवण्याची

शपथ चला आपण घेऊ

वसुधैव कुटुंबकम

हे ब्रीद मनामनात कोरू.....

# त्याच्यातील ती

अश्मिता परवार (प्रथम वर्ष, कला शाखा)

माझे पण अंग आहे मातीचे

मला पण देवानेच बनविले आहे

मी तर तशीच आहे जसे देवाने केले आहे

सगळे म्हणतात की मी मुलगा आहे तर का तू श्रृंगार करतोस?

मला छान वाटते शृंगार करायला

कारण मी स्वतःवर प्रेम करतो

कृष्णही बनतो मोहिनी

कधी अंबा बनते शिखंडी

माझ्यामध्येच आहे शिव आणि शक्ती

मी नाही सांगत माझा देव बनवा, आशिर्वाद घ्या

मी तुमच्यातलीच एक आहे

मी पण एक माणूस आहे

विनंती आहे माझी मला माणसांसारखे वागवा

मानते की मी तुमच्यापेक्षा वेगळी आहे

पण चुकीचा मात्र नाही.

माझी ओळख असू शकते LGBTQ

पण खरी ओळख तर सर्वांचीच आहे.. एक माणूस !



# रेशमी मैत्रीचे बंध

राज सावके (द्वितीय वर्ष, कला शाखा)

रंग प्रेमाचे उधळीत जीवन क्षितिजावर
उगवतो भास्कर नवा
त्याच्या सोनेरी किरणांनी उजळून जाई
हृदयाचा गाभारा
वाटतो सारखा हवाहवासा..
आनंदाचे होऊन कवडसे
स्मितहास्य फुलवतो ओठी
अंधारातून चाचपडताना भेटतो
जुळती जन्मान्तरीच्या गाठी
सूर्यबिंब हा प्रीतीचा वाटतो जणू कोंदण
जीवनी दाटला अंधार
प्रकाश होऊनी नव्या हर्षाचा
जन्म घेतो नवा चंद्र..
सुंदर पहाट जन्मे नभी
सारूनी काळरात्र भयाण
आयुष्याच्या काटेरी वळणावर
मिळे सोबत कुणाची तरी
रंग नवा अर्थ प्रीतीचा वाटे सहज
नव्याने छान..
सुंदर रेशमी प्रेम बंध हे विणूनी
गुंफले प्रतिबंध
मनी हळुवार ओढ जगता
मनाची मनाशी भावंतरी आजन्म गुंफण.



# प्रीत सांज

राज सावके (द्वितीय वर्ष, कला शाखा)

ऐन सांजवेळी सागरतीरी
उमटती पाऊलखुणा सावल्यांच्या
मंद प्रकाशने सोनेरी होती
लाटा नीलसागराच्या
क्षितजावरचे सूर्यबिंब
हळू हळू खाली घसरते
उंच नभात उडणाऱ्या पक्षांचे प्रतिबिंब
पाण्यात विरते ..
वाळूच्या स्पर्शाने तळवेही मऊ-मखमली होतात
चंद्र-चांदणे आभाळ सजवती
वाटते,
असावा हात कुणाचा हातात.
प्रेम गंध हा दरवळे रोमरोमी
मन होते बेधुंद
अंगावर शहारा उठवी वारा मंद..
सांज रंगली प्रेम रंगात
चंद्र सूर्य नभीचा
सूर प्रेमाचे छेडीतो
क्षण मंतरलेल्या ह्या प्रेमाची
जादू मनावर होते
ही प्रीत मखमली बंध रेशमी
जन्मान्तरीचे जोडीते.
समुद्रतीरी सहवास कुणाचा तरी
जणू शिंपले मोत्यापरी
हे प्रेम करीते बावरे
जागे तरंग हवहवेसे अंतरमनी ..

# बाबा

राज सावके (द्वितीय वर्ष, कला शाखा)

आईनंतर मुलांचा सगळ्यात जास्त आवडता असतो

मुलांवर जिवापाड प्रेम करणारा एक बाबाच तर असतो..

मुलांचा मित्र बनून राहतो, त्यांचे लाड करतो

सारे हट्ट पुरवतो

आई मारते तेव्हा पंखांखाली घेतो

मुलांचा हक्काचा पाठीराखा असतो

त्यांचा सगळ्यात जवळचा एक बाबाच तर असतो.



बाबा हा बाबा असतो

दुःखे, अश्रू लपवून सारी

हसू ओठी आणून

केवळ लेकरांसाठी जगतो.

बाबा हा बाबा असतो

बाबा हा बाबा असतो

ज्याच्या हाती संसाराचा ताबा

मुलांच्या आनंदासाठी राबतो

मुलांचा तो लाडका

कधी चिडणारा,

कधी ओसंडून वाहतो प्रेमाचा झरा

तोच असतो बाबा

तोच असतो बाबा..

# जैत

सलोनी फळदेसाई (प्रथम वर्ष, कला शाखा)

लहानपणी

एक पाऊल उचललं की,

दुसरं टेकतं

हे कळण्याआधी

एकदा पडावंच लागतं

तुटलेलं खेळणं जोडताना,

ते पुन्हा एकदा तुटलेलं

पहावंच लागतं

एखाद्या चित्रकाराला

चित्र काढताना,

ते जमलं नाही म्हणून

खोडावंच लागतं

आयुष्यात

मोठे पल्ले गाठण्याआधी,

एकदा

झुकावंच लागतं

म्हणूनच म्हणतात,

जीवनात एकदा जिंकण्यासाठी,

हार स्वीकारायला शिकावं लागतं

आणि त्यासाठी शंभर वेळा हरावं लागतं.



# सोबती

अश्मिता परवार (प्रथम वर्ष. कला शाखा)

का गं तू अशी, का गं मी अशी?

सांगायचे खूप काही आहे

पण कसे सांगू ते अजूनही कळत नाही

खूप काही सांगायचे आहे.

पण सांगता येत नाही.

तूच तर माझी सोबतीण

तूच तर माझी मैत्रीण

आपण बनवू एकत्र घर

जग काय बोलेल याची पर्वा नाही

पण तूच तर माझी साथीदार गं

तूच तर माझी सोबतीण..

तूच तर माझी प्रेयसी

तू आणि मी राहू एकत्र

बनवू आपले एक छोटेसे घर

बनवू आपले एक छोटेसे घर..



.

# बाबा

अनिशा प्र. गावकर (द्वितीय वर्ष, कला शाखा)

फणसासारखा असतो बाबा
बाहेरून काटेरी
आतून मऊ

कठोर, रागीट स्वभावाचा जरी असला
तरीही बाबांसारखे प्रेम करणारा
नाही कोणी कोणाला

फणसाच्या काट्यांसारखे खंबीरपणे
रक्षण करतो आपल्या कुटुंबाचे
आतील गोडवा, आतील जिव्हाळा
टिकवून ठेवतो बंधन नात्यांचे

स्वतःला कितीही त्रास झाला
तरीही बोलून तो दाखवत नाही
आपल्या लेकरांना मात्र जरा काही झालं
तर सगळं जग घेतो डोक्यावरी

असा हा बाबा
कितीही रागवला, ओरडला
तरी त्यातूनही प्रेम, काळजी व्यक्त करणारा
दिसत असला कितीही कठोर
तरी बाबा असतो मुलांना जिवापाड जपणारा.

# प्रेम

**रेखा मायनाथ (द्वितीय वर्ष, कला शाखा)**

तुझ्याशिवाय जीव माझा कुठेही रमेना
तुझ्यासारखा दुसरा मला कोणीही मिळेना

तूच पाहिजे तूच मला
असं झालंय माझ्या जीवाला
तुझी सोबत हवी आहे माझ्या मनाला

तूच हवाय तूच मला
जीव माझा गुंतून गेला
अश्रूही आहेत साक्षीला
आठवण तुझी घोर लावी मनाला

वेड लावलंय तू मला
नव्याने मी भेटले स्वतःला
तूच पाहिजे तूच मला
असं झालंय माझ्या जीवाला

# पाऊस

किर्ती वेळीप (द्वितीय वर्ष, कला शाखा)

आभाळात दाटले काळे ढग
डोंगरातून आली पाण्याची सर
ऋतू आला हा पावसाळा
थेंब पडतो मोत्यांचा



आल्या आल्या पावसात
मुलं खेळतात पाण्याच्या धारात
मेघ गरजतात आभाळात
पक्षी गातात मंजुळ आवाजात

मातीचा सुगंध सर्वत्र पसरतो
पाऊस हा असा वेडा-पिसा
एकच जागा निश्चित करतो
तीही आपल्या मनात.

|| युवांकुर ||

मराठी

विभाग